सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**पुणे शहर विभागीय क्रीडा समिती**
द्वारा. ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे
**कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे - ४११ ००१**
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५७६६० / २६०५८५८७ एक्स.: ११४३ Website: www.pczsc.in

डॉ. मनिषा कोंढरे — सचिव
प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे — कार्याध्यक्ष
प्राचार्य डॉ. दत्तात्रय बोरमणे — अध्यक्ष

संदर्भ क्र.: पीसी/झेडएसी/२०८/२०१९-२० दिनांक : १०/१०/२०१९

प्रति
मा. प्राचार्य,
सर्व संबंधित महाविद्यालये

**विषय : खेळाडू पात्रता फॉर्म बाबत...**

महोदय / महोदया,

आपणास माहितच आहे की, विद्यापीठ क्रीडा मंडळाने सन २०१९-२० पासून खेळाडूंसाठी पात्रता फॉर्म ऑनलाईन भरणे बंधनकारक केले आहे. आपणस विनंती आहे की, खेळाडूंचे पात्रता फॉर्म (हार्ड कॉपी) जमा करताना सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे की नाही याची खात्री करूनच फॉर्म अंतिम तारखेच्या व वेळेच्या आत आयोजक महाविद्यालयाकडे सुपूर्त करावेत. अपुर्ण फॉर्म अथवा वेळेत न येणाऱ्या फॉर्मचा विचार केला जाणार नाही, तसेच सदर संघ/ खेळाडू अपात्र ठरविले जातील.

निवड चाचणीसाठी येणाऱ्या खेळाडूंनी पात्रता फॉर्म सोबत महाविद्यालयाचे पत्र व मागील वर्षातील खेळातील सहभाग पत्र ड्रॉज मिटिंगच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे. ड्रॉज मिटिंगच्या वेळी पात्रता फॉर्म नसणाऱ्या महाविद्यालयाचे नाव ड्रॉजसाठी ग्रहीत धरले जाणार नाही. सर्व स्पर्धा आयोजकांना विनंती की, ड्रॉजच्या वेळीच सर्व पात्रता फॉर्म तपासून काही त्रुटी असतील तर संबधीत महाविद्यालय / खेळाडूंकडून दुरुस्त करून घ्याव्यात. अन्यथा सदर महाविद्यालयास/खेळाडूंस स्पर्धामध्ये सहभागी होण्यास मनाई केली जाईल. तसेच प्रत्येक स्पर्धेच्या वेळी संबधित महाविद्यालयाचा संघव्यवस्थापक उपस्थित असणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर संघास/खेळाडूस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही याची सर्व महाविद्यालयानी नोंद घ्यावी.

सर्व महाविद्यालयांना विनंती की, सदर नियमांचे काटेकोर पालन करून आयोजक महाविद्यालय व पुणे शहर विभागीय क्रीडा समितीस सहकार्य करावे.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

**डॉ. डी. एस. बोरमणे**
अध्यक्ष
पुणे शहर विभागीय क्रीडा समिती